# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ११/११/२०१८

**मालेगाव शहरातील मनमाड चौफुली परिसरात गावठी पिस्टल बाळगणारा इसम जेरबंद**
**०१ पिस्टल, ०७ जिवंत काडतुसे व ०२ मॅगझिन हस्तगत - स्थानिक गुन्हे शाखेची हप्त्यात तिसरी कारवाई**

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची जिल्हाभरात धडक कारवाई सुरु आहे. मालेगाव शहरातील मनमाड चौफुली परिसरात हॉटेल साईसिध्दी समोर अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे एका इसमास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन त्याचे कब्जातुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०७ जिवंत काडतुसे व ०२ मॅगझिन सह गुन्हयात वापरलेली मोटर सायकल हस्तगत केली आहे.

आज दिनांक ११ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्तबातमी नुसार, मालेगाव शहरातील मनमाड चौफुली परिसरात काही संशयीत इसम हे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मनमाड चौफुली परिसरातील हॉटेल साईसिध्दी समोर सापळा रचुन संशयीत **इसम नामे मंजुर हुसेन मुज्जफर हुसेन, वय ३४, रा.गुलशने मालीक, सर्व्हे नं.१०७, मालेगाव** यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०७ जिवंत काडतुसे, ०२ मॅगझिनसह** गुन्हयात वापरलेली एक **होण्डा शाईन मोटर सायकल** हस्तगत करण्यात आली. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना मिळुन आला नाही. सदर इसम हा विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळुन आला असुन त्याचेविरूध्द **मालेगाव किल्ला पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गेल्या आठवडाभरात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारे **एकुण ०६ आरोपीतांविरूध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये कारवाई** करून **०४ देशी बनावटीचे पिस्टल, १२ जिवंत काडतुसे, ०५ मॅगझिनसह** गुन्हयात वापरलेल्या **०२ मोटर सायकल व ०१ स्विफ्ट कार** हस्तगत केली आहे. आगामी काळात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारे इसमांवर अशाच प्रकारे कारवाई सुरु राहणार आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो, व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल सो यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे.